- 8 APR 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनी 'कॅशलेस' अर्थव्यवहार करावा

## कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे यांचे आवाहन : शिवाजी विद्यापीठात 'पीओएस' यंत्रे बसवण्याचा शुभारंभ

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

केंद्र सरकारच्या कॅशलेस आर्थिक व्यवहाराच्या धोरणाला बळकटी देण्यासाठी शिवाजी विद्यापीठानेही कॅश विभागात 'पॉईंट ऑफ सेल' (पीओएस) यंत्रे बसविली आहेत. विद्यार्थी, पालक आणि विद्यापीठाशी संबंधित यंत्रणांनी त्याद्वारे अधिकाधिक कॅशलेस व्यवहार करावा असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कॅश विभागामध्ये ॲक्सिस बँकेच्या सहकार्याने रोखरहित व्यवहारांसाठी 'पीओएस' यंत्रे बसविण्यात आली आहेत. या सेवेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कॅश विभागात विद्यार्थ्यांशी संवाद साधताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत इतर अधिकारी.**

रोख रक्कम भरण्यासाठी विद्यार्थ्यांशी संवाद साधत, कुलगुरू म्हणाले, बहुतांश विद्यार्थी किंवा त्यांच्या पालकांकडे एटीएम-डेबीट कार्ड असतात. त्या सर्वांनी पीओएसद्वारे किंवा अगदी मोबाईलवरून युपीआय, भीम ॲपच्या माध्यमातून देणी भागविल्यास केंद्र सरकारचा हा उपक्रम निश्चितपणे आपण सर्व मिळून यशस्वी करू शकतो. शिवाजी विद्यापीठाने यापूर्वी दीक्षांत समारंभासाठीचे शुल्क ऑनलाइन स्वरुपात स्वीकारून गेल्या वर्षीपासूनच कॅशलेस व्यवहारांना प्राधान्य देण्याचे धोरण स्वीकारले आहे. त्याचे पुढचे पाऊल म्हणजे 'पीओएस' सेवा आहे. या सेवेचा सर्व संबंधितांनी लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. शिंदे यांनी केले.

प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांनी विद्यापीठात ज्या ज्या ठिकाणी आर्थिक व्यवहार केले जातात, अशा सर्व ठिकाणी पीओएस यंत्रे बसविण्यात येणार असल्याचे सांगितले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. डी.के. गायकवाड यांच्यासह ॲक्सिस बँकेचे अधिकारा, विद्यापीठातील अधिकारी व सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- 8 APR 2017 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात पॉइंट ऑफ सेल यंत्रणेस प्रारंभ

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

केंद्र सरकारच्या रोखविरहित आर्थिक व्यवहार धोरणाला बळकटी देण्याच्या उद्देशाने शिवाजी विद्यापीठात कॅश विभागात 'पॉइंट ऑफ सेल' (पीओएस) यंत्रणेला सुरुवात करण्यात आली आहे. ॲक्सिस बँकेच्या सहकार्याने रोखरहित व्यवहारांसाठी 'पीओएस' यंत्रे बसविण्यात आली आहेत.

गुरुवारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते या यंत्रणेचा प्रारंभ करण्यात आला.

यावेळी डॉ. शिंदे म्हणाले, बहुतांश विद्यार्थी किंवा त्यांच्या पालकांकडे एटीएम-डेबिट कार्ड असतात. सर्वांनी पीओएसद्वारे किंवा मोबाईलवरून यूपीआय, भीम ॲपच्या माध्यमातून देणी भागविल्यास केंद्र सरकारचा उपक्रम यशस्वी करू शकतो. शिवाजी विद्यापीठाने यापूर्वी दीक्षांत समारंभासाठीचे शुल्क ऑनलाइन स्वरूपात स्वीकारून गेल्या वर्षीपासूनच रोखविरहित व्यवहारांना प्राधान्य देण्याचे धोरण स्वीकारले आहे. त्याचे पुढचे पाऊल म्हणजे 'पीओएस' सेवा आहे. या सेवेचा सर्व संबंधितांनी लाभ घ्यावा.

याप्रसंगी कुलगुरूंनी पीओएस सेवेबाबत उपस्थित विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांनी विद्यापीठात ज्या ज्या ठिकाणी आर्थिक व्यवहार केले जातात, अशा सर्व ठिकाणी पीओएस यंत्रे बसविण्यात येणार असल्याची माहिती दिली.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. डी. के. गायकवाड यांच्यासह ॲक्सिस बँकेचे अधिकारी व विद्यापीठाच्या लेखा विभागातील अधिकारी व सेवक उपस्थित होते.